दै. उद्याचा मराठवाडा दि. 11.03.2025

## कोनाळेजच्या विद्यार्थिनींचा निर्भया रॅलीत सहभाग



नांदेड जिल्ह्यात जागतिक महिला दिनानिमित्ताने नांदेड पोलीस दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या निर्भया रॅलीमध्ये कोनाळे कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला. यावेळी विद्यार्थिनींसह जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्यासह कोनाळे कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. व्ही.डी. कोनाळे व संचालिका अनुसया कोनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दै. देशोन्नती दि. 11.03.2025

# चोरीस गेलेल्या ६ मोटारसायकली आरोपीकडून जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरीस गेलेल्या ६ मोटार सायकली स्थानिक गून्हे शाखेच्या पथकाने जप्त करून एका चोरट्यास ताब्यात घेतले आहे.

जिल्हयातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत स्थानिक गून्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते. त्यावरून १० मार्च रोजी गुप्त माहिती घेतली असता आरोपी रमेश कयापाक रा. बेलानगर, नादेड याने वेगवेगळया ठिकाणी मोटार सायकल चोरी केल्याची माहिती मिळाल्यावरून सदर आरोपीचा शोध घेवुन त्याला ताब्यात घेवुन कसुन चौकशी करून त्याचे ताब्यातुन जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी चोरी केलेल्या एकुण ६ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

या कारवाई पथकात सपोनि रवी वाहुळे, घोगरे, पोउपनि दासरे, करले, देविदास चव्हाण, कदम, सुरेश घुगे, मिलिंद नरबाग, यादगिरवाड, राजू सिटीकर यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा समावेश होता.